# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

*नॅक पुर्नमुल्यांकन 'अ' दर्जा प्रमाणित*

# रसायनशास्त्र विभाग

## जाहीर निवेदन

### एम. एस्सी. (रसायनशास्त्र) प्रवेशपुर्व परिक्षा

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करिता एम. एस्सी. (रसायनशास्त्र) प्रथमवर्षाकरिता प्रवेश घेवु ईच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांना याव्दारे सूचित करण्यात येते की, रसायनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तसेच रसायनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप-परिसर, उस्मानाबाद येथे एम. एस्सी. (रसायनशास्त्र) प्रथमवर्ष प्रवेशाकरिता एकत्रित प्रवेशपुर्व परिक्षेचे आयोजन करण्यात आलेले असुन, सदर दोन्ही केंद्रावर विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयी नुसार परिक्षा केंद्र निवडावे.

सदर प्रवेशपुर्व परिक्षा दोन्ही केंद्रावर बुधवार, दिनांक २५ मे, २०१६ रोजी दुपारी १२:०० ते ०२:०० या वेळेत घेतली जाईल, विद्यार्थ्यांनी आपल्या निवडलेल्या केंद्रावर परिक्षेच्या एक तास अगोदर उपस्थित राहाणे अनिवार्य आहे. प्रवेशपुर्व परिक्षेकरिताचे विहित नमुन्यातील अर्ज दिनांक १६ मे, २०१६ पासुन २३ मे, २०१६ या दरम्यान सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यन्त रुपये २०/- भरुन विद्यार्थी दोन्ही ठिकाणाहुन उपलब्ध करुन घेवु शकतात तसेच भरु शकतात. विद्यापीठाच्या www.bamu.net या संकेतस्थळावर देखील सदर अर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांनी सदर अर्ज जमा करतांना विहित शुल्का व्यतीरिक्त रुपये २०/- भरावेत. पोस्टाने अर्ज पाठविणा-यांनी त्यांचे अर्ज दिनांक २३ मे, २०१६ पर्यन्त विभागात प्राप्त होतील अशा बेताने पाठवावेत, निर्धारित वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच प्रवेशपुर्व परिक्षा शुल्क खुल्याप्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता रुपये ४००/- व राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता रुपये २००/- आकारण्यात यईल. सदर प्रवेश परिक्षाशुल्क अर्ज जमा करतांना दोन्ही केंद्रावर रोखीने भरता येवु शकतील तसेच कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या नांवे काढण्यात आलेले धनादेशही स्विकारण्यात येतील. अर्जा सोबत राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांचे जातीच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रति जोडणे आवश्यक आहे.

सदर प्रवेशपुर्व परिक्षेचा निकाल सोमवार, दिनांक ३० मे, २०१६ रोजी दुपारी ०३:०० वाजता दोन्ही केद्रांच्या सुचना फलकावर तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल. प्रवेशपुर्व परिक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी गुणवत्तेनुसार दोन्ही ठिकाणी प्रवेशाकरिता अर्ज करु शकतील.